# मिरा भाईंदर महानगरपालिका

## घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभाग

## प्रेसनोट

**मौजे उत्तन येथील प्रकल्प ठिकाणी घनकचरा संकलित करुन पाठवण्यात येणाऱ्या गाड्यांबाबत**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गाड्या मौजे उत्तन घनकचरा प्रकल्प ठिकाणी कचरा खाली न करता परत महानगरपालिका परिसरात येतात. त्यामुळे भ्रष्टाचार होत असल्याचे असे नमुद केले आहे.

त्यानुसार आपणांस नम्रपुर्वक कळविण्यात येते कि, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दोन झोन मधील एकुण २४ वॉर्ड मधून दैनंदिन निर्माण होणारा अंदाजे ४५० ते ५०० मेट्रीक टन घनकचरा १५७ वाहनांद्वारे संकलित करुन मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी प्रक्रियेसाठी पाठविण्यात येतो.

सर्व वाहने महानगरपालिकाद्वारे निश्चित करण्यात आलेल्या ROUTE नुसार घनकचऱ्याचे शहरातील सोसायटी, व्यावसायिक भाग, झोपडपट्टी इ. भागांमधुन घनकचरा दैनंदिनरित्या संकलित करण्यात येतो व हा घनकचरा मौजे. उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प येथे प्रक्रियेकरीता पाठविण्यात येतो. प्रकल्पांवर येणाऱ्या प्रत्येक वाहनांचे वजन काट्यावर घनकचरा भरलेली गाडी व रिकामी गाडी यांचे वजन करुनच व त्यांच्या नोंदवहीमध्ये नोंद घेऊनच घनकचरा प्रकल्पावर गाड्या खाली करण्यात येतात. तसेच प्राप्त होणाऱ्या घनकचऱ्याच्या या नोंदवहीवर स्वच्छता अधिकारी तसेच घनकचरा प्रकल्प येथे नेमुणक केलेल्या मुकादम यांची स्वाक्षरी करुन प्रमाणीत करण्यात येतात.

घनकचरा संकलनाकरीता नेमलेल्या ठेकेदारास काम घनकचरा संकलनाकारीता प्रति दिन प्रति वाहन पुरवठा दर याप्रमाणे दिलेले असुन प्रति टन घनकचरा संकलन असे देण्यात आलेले नाही.

तरी आपल्या तक्रारीच्या अनुषंघाने पडताळणी करण्यात आलेली असुन आपण तक्रारीत नमुद केलेल्या गाड्या प्रक्रिया प्रकल्प येथुन रिकाम्या होऊन शहरांमध्ये असलेल्या पार्किंग डेपोमध्ये जात होत्या याबाबतची पडताळणी वजन काटा नोंदनीनुसार करण्यात आलेली आहे. (सोबत वजन काटा पावती)

घनकचरा संकलन ठेकेदारास प्रतिदिन वाहन पुरवठा असे काम देण्यात आलेले असल्याने वाहनांचे फेरे वाढवुन अनावश्यक लाभ घेण्याचा प्रश्न येत नाही.

तरी प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंघाने पडताळणी केली असुन तक्रारीमध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य असल्याचे दिसुन येत नाही.

Scanned with OKEN Scanner